# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - १८ ऑक्टोबर २०२४

---

**भाषा प्रशाळेच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय कबड्डी संघात निवड**

जळगाव दि. १८ ( प्रतिनिधी) : कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या प्रथम वर्ष एम.ए. हिंदीच्या विद्यार्थी महेश बिज्या वसावे यांच दिव्यांगामधुन देशाच्या राष्ट्रीय कबड्डी संघात निवड झल्याबद्दल प्रशाळेच्या संचालक प्रा. म.सु.पगारे यांनी प्रशाळेच्या वतीने सत्कार केला.

याप्रसंगी बोलतांना प्रा.पगारे यांनी विद्यार्थी हा देशाचे भविष्य असतो. देशाला एका उंचीवर घेऊन जाण्याचे काम विद्यार्थीच करु शकतो , म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे. तसेच मेहनत,जिद्द व चिकाटी या गुणांच्या बळावर देशासाठी अनेक पदके प्राप्त केली पाहिजेत असे मत व्यक्त केले.

आपल्यातील व्यंगावर मात करत महेश वसावे याने हे यश प्राप्त केले आहे. परिस्थितीचे भांडवल न करता प्रामाणिकपणे प्रयत्न करत महेशने यश प्राप्त केले असल्यामुळे हे यश विशेषत: आगळेवेगळे आहे. या यशाची प्रेरणा घेऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रा. पगारे यांनी केले. याप्रसंगी प्रशाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.कृष्णा संदानशिव सर यांनी केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**जनसंपर्क अधिकारी**